MHGA030002472023

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गडचिरोली यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी : चं. प्र. रघुवंशी)

**<u>म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ०७/२०२३</u>**

१. शली यशवंत शेन्डे,
वय ४० वर्षे, धंदा : घरकाम,

२. कु. कल्पक यशवंत शेन्डे
वय १७ वर्षे, धंदा : शिक्षण,

३. अनुज यशवंत शेन्डे
वय १३ वर्षे, धंदा : शिक्षण,

(अर्जदार क्र.२ ते ३ तर्फे अर्जदार क्र.१
अज्ञानपालनकर्ती आई म्हणून)
सर्व रा. साईनगर, वार्ड नं ४, कारमेल शाळेच्या मागे,
गडचिरोली तह.जि.गडचिरोली ... अर्जदार

–– विरूध्द –

१. श्री. यशवंत भिवाजी शेन्डे
वय ५२ वर्षे, धंदा : नोकरी,

२. श्रीमती रुकमाबाई भिवाजी शेन्डे
वय ६० वर्षे, धंदा : घरकाम,
रा. रामनगर, पोटेगाव रोड,
हजारेच्या चक्कीजवळ, मस्जीदजवळ,
गडचिरोली, ता. जि. गडचिरोली. ... गैरअर्जदार

**<u>निशाणी क्र. ०५ वर आदेश</u>**
(दिनांक २९/११/२०२३)

१.  अर्जदाराने प्रस्तुत अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये अर्जदारांचे अंतरीम पोटगीकरीता, प्रतिबंधात्मक आदेशाकरिता, संरक्षण आदेशाकरिता व मनाई हुकूमाच्या आदेशाकरिता दाखल केला आहे.

२.  अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र. १ आणि गैरअर्जदार क्र.१ हे पती–पत्नी असून त्यांचा विवाह ११.०४.२००४ रोजी जातीरिवाजानुसार झाला. गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदार क्र. १ ची सासू आहे. गैरअर्जदार क्र. १ हा जिल्हा परिषद उच्च प्राथमीक शाळा, दुधमाळा ता. धानोरा, जि. गडचिरोली येथे शिक्षक या पदावर कार्यरत आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ ला लग्नानंतर फक्त काही दिवस चांगली वागणूक दिली व त्यानंतर गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ ला त्रास देणे सुरू केले. अर्जदार तेलंगणाची आहे, तिची उंची कमी आहे म्हणून चिडवायचे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराकडे लक्ष देत नव्हता. तो अर्जदार क्र. १ ला टाळत होता व अर्जदाराकडे दुर्लक्ष करीत होता.

३.  सन २०१८ मध्ये गैरअर्जदार क्र. १ ची बदली एटापल्ली येथे झाली आणि तेव्हा गैरअर्जदार क्र. १ हा फोनवर अर्जदाराला " मला घरी यावस वाटत नाही" असे म्हणत होता. सन २०१८ ला गैरअर्जदार क्र. १ ला एरियर्सचे रक्कम रू. १०,००,०००/– मिळाले पण त्याने मुलाबांळासाठी एकही पैसा खर्च केला नाही. गैरअर्जदार हे नेहमी बाहेर राहत होते आणि कुणासोबत फोनवर बोलत राहत होते. गैरअर्जदार हे अर्जदारावर आणि मुलांवर चिडचिड करायचे आणि मुलांना " तुम्हाला मरी कशाला येत नाही" असे म्हणत होते.

४.  सन २०१९ मध्ये गैरअर्जदार हे प्रमोशनवर बदली होउन वाकडी ता जि गडचिरोली येथे आले. पण गैरअर्जदार हे फोनवरच बोलत राहत होते आणि जास्तीत जास्त वेळ घराबाहेर घालवत होते. माया डोंगरे हिच्यासोबत गैरअर्जदार क्र.१ चे अनैतिक संबंध आहे. त्यामुळे अर्जदाराला खुप मोठा धक्का बसला. काही दिवसाने अर्जदाराला गैरअर्जदाराच्या सोबतच्या लोकांकडून कळले की, जपतलाई येथील एका नर्स सोबत गैरअर्जदाराचे अनैतीक संबंध आहेत. अर्जदाराला गैरअर्जदाराच्या सुटकेसमध्ये नर्सचे वैयक्तीक कागदपत्रे आढळून आले. अर्जदाराने याबाबत गैरअर्जदाराला विचारले असता अर्जदाराला शिवीगाळ करून भांडण केले तेव्हापासून नेहमी अर्जदारासोबत भांडण करून

मारझोड करणे गैरअर्जदाराने चालू केले. दिनांक २५.१०.२०२० ला दस–याच्या दिवशी गैरअर्जदाराने अर्जदाराला शारीरीक सबंधाची मागणी करू लागले अर्जदाराने नकार दिल्याने अर्जदाराला बेडवर आपटले त्यामुळे अर्जदाराच्या कंबरेला दुखापत झाली.

५. दिनांक २४.१२.२०२० रोजी गैरअर्जदाराने अर्जदाराला मारहान केली त्यामुळे अर्जदाराने दुस–या दिवशी महिला व मुलांचे सहायय कक्ष पो.स्टे. ता जि गडचिरोली येथे तक्रार दिली. अर्जदाराची सासु ही अर्जदार ही पागल आहे असे सांगून तिची बदनामी करतात. दिनांक ३१.०१.२०२१ रोजी अर्जदार व तिचे दोन मुले पोटेगाव रोडवर फिरायला गेले असता गैरअर्जदार हे मोटार सायकलने एका महिलेला घेवून जाताना दिसले तेव्हा अर्जदार व मुलांना पाहून गैरअर्जदाराने गाडीची स्पीड वाढविली आणि निघून गेले. अर्जदाराने याबाबत गैरअर्जदारास विचारणा केली असता गैरअर्जदाराने अर्जदाराशी भांडण करून आपल्या आईकडे राहायला निघून गेले. अर्जदाराला आपल्या मुलांसोबत राहावे लागत होते. घर खर्चासाठी, मुलांची फी भरण्यासाठी एक पैसा सुध्दा दिले नाही. कित्येक दिवसांनतर गैरअर्जदार घरी येवून अर्जदाराला अश्लील शिवीगाळ करत होते. दिनांक १३.०६.२०२१ ला अर्जदाराचे माहेरचे लोक आणि गैरअर्जदाराचे कुटूंबातील लोक एकत्र आले आणि गैरअर्जदाराला समजावून सांगितले. त्यांनतर गैरअर्जदार काही दिवस अर्जदार आणि मुलांसोबत चांगले वागले नंतर पुन्हा पुर्वीसारखे झगडे भांडण करू लागले. दिवाळीनंतर गैरअर्जदाराने अर्जदाराला पाठीवर, मानेवर मारले त्यामुळे अर्जदाराला दुखापत होउन निळे निळे डाग पडले. त्यामुळे अर्जदार आपले माहेरी गेली.

६. अर्जदाराने यापुर्वी विदयमान न्यायदंडाधिकारी, प्र. श्रेणी, गडचिरोली येथे पि डब्लू डी वी मा क्र. ०५/२०२२ (शली वि यशंवत) प्रमाणे गैरअर्जदार क्र. १ व २ चे विरूध्द कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण कायदया अंतर्गत अर्ज केला होता. सदर मामला हा प्रलंबित असंताना तो जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गडचिरोली येथे मध्यस्ती करीता पाठविण्यात आला. त्यात गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला मानसिक, शारिरिक त्रास देणार नाही, गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराला आर्थीक सहाय करेल तसेच गैरअर्जदार हा अर्जदार क्र. २ व ३ ला शिक्षणा करीता लागणारा आर्थीक सहाय्य करेल या प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचेत दिनांक २६.०४.२०२२ ला आपसी समझोता झालेला होता.

७. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ एकत्र नांदू लागले. काही दिवसानंतर अर्जदारास शारिरिक, मानसिक व भावनिक तसेच आर्थीक त्रास देउ लागले. दिनांक १५.०५.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदारासोबत भांडण केले, खराब शब्दात शिवीगाळ करण्यास सुरूवात केली व अर्जदार क्र. १ ला मारझोड केली. पोलीसांकडे तक्रार दिली असता पोलिसांनी अर्जदार व गैरअर्जदार यांना पोलिस स्टेशन येथे बोलावून घेतले व गैरअर्जदाराकडून यानंतर तो असा करणार नाही असे लिहून घेण्यात आले. अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ ला घर खर्चाकरीता पैसे मागीतले असता गैरअर्जदार क्र. १ हा पैसे देत नाही. डॉक्टराने अर्जदारास गर्भाशय काढण्याचा सल्ला दिलेला आहे. अर्जदाराला स्पान्डेलाईटीसचा त्रास आहे, तिला थायराईडचा त्रास आहे. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला मारझोड केली असल्याने तिचा हात सुध्दा नेहमीच दुखत राहतो व त्यामुळे अर्जदाराला शारिरिक वेदनेला सामोरे जावे लागत आहे. गैरअर्जदार क्र. १ हा डिंपल खंडागळे यांचे संपर्कात आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ चा पती म्हणून व अर्जदार क्र. २ व ३ यांचा वडील म्हणुन आपली जबाबदारी पार पाडत नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ने दिनांक ३.३.२०२३ रोजी गैरअर्जदारांचे विरूध्द पोलिस स्टेशन गडचिरोली येथे रिपोर्ट दिलेली आहे. गैरअर्जदार क्र. १ हा दि.१८ फरवरी २०२३ पासून परत अर्जदारांना सोडून आपले आईकडे राहतो.

८. गैरअर्जदार क्र. १ हा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधमाळा ता धानोरा जि गडचिरोली येथे शिक्षक या पदावर नौकरीवर असून त्याला प्रतिमहा रक्कम रू. १,५०,०००/– पगार मिळतो. तसेच त्याचेकडे मौजा मासरगाटा ता धानोरा जि गडचिरोली येथे २ एकर शेती असून त्यापासून प्रतिवर्ष रक्कम रू २,००,०००/– उत्पन्न मिळतो. अशा परिस्थितीत उपरोक्त अर्जदाराना येणारा खर्च पुरविण्याची गैरअर्जदाराची कायदेशिर जबाबदारी आहे. सदर खर्च पुरविण्यास गैरअर्जदार हा सक्षम आहे.

९. अर्जदाराला प्रतिमहिना दवाखान्याकरीता, पालनपोषनाकरीता तसेच कपडडेलत्याकरिता व औषधोपचाराकरीता प्रतिमहा रक्कम रू. ३०,०००/– खर्च येतो. तसेच अर्जदार क्र. २ हा स्कुल ऑफ स्कॉलर, गडचिरोली येथे सदयास्थितीत १२ वी मध्ये असून त्याला शिक्षणाकरीता, कपडेलत्तेकरीता तसेच औषधोपचाराकरीता, पालनपोषनाकरीता प्रतिमहा रक्कम रू. २०,०००/– खर्च येतो. तसेच अर्जदार क्र. ३ हा

नेहरूशाळा गडचिरोली येथे ८ व्या वर्गात शिक्षण घेत असून त्याला सुध्दा शिक्षणाकरिता, पालनपोषनाकरिता, औषधोपचाराकरीता, कपडडेलत्याकरिता प्रतिमहा रक्कम रू. २०,०००/– खर्च येतो. परंतु अर्जदारांना कमाईचे कोणतेही साधन नसून ते उपरोक्त खर्च करण्यास असमर्थ आहेत. त्यामुळे अर्जदाराला आर्थीक विवंचणेला सामोरे जावे लागत आहे. सबब, सदर अंतरिम पोटगी करिता आदेश व्हावा. तसेच गैरअर्जदारांनी किवा त्यांचे तर्फे ईत्तर कुणीही अर्जदारांना मौजा साईनगर, वार्ड क्र.४, गडचिरोली ता जि गडचिरोली येथील घरातुन काढू नये म्हणून गैरअर्जदाराचे विरूध्द प्रतिबंधात्मक आदेश पारीत करण्यात यावा. तसेच गैरअर्जदारांनी किवा त्यांचे तर्फे ईत्तर कुणीही अर्जदारांचे मौजा साईनगर, वार्ड क्रंमाक ४ गडचिरोली ता जि गडचिरोली येथील रहिवासास अडथळा करू नये किवा अर्जदारांवर कसलाहि कौटुबिंक हिसांचार करू नये म्हणून अर्जदारांचे बाजूने संरक्षण आदेश पारीत करण्यात यावा. तसेच गैरअर्जदारांनी मौजा साईनगर वार्ड कं.४ गडचिरोली ता जि गडचिरोली येथील मालमत्ता किवा अर्जदाराचा हिस्सा असलेली कोणतेही मालमत्ता किवा शेतजमीन विकू नये किवा हस्तांतरण करू नये किवा बक्षीस करू नये असे गैरअर्जदारांचे विरूध्द प्रतिबंधात्मक आदेश पारीत करण्यात यावा. सबब, प्रस्तुत अर्ज.

१०.	गैरअर्जदार क्र.१ यांनी निशाणी १३ वर म्हणने दाखल करून अर्जास विरोध केला. गैरअर्जदार क्र.२ यांनी म्हणने दाखल केलेले नसल्याने नि.क्र.१ वरिल दिनांक २०.०७.२०२३ रोजीच्या आदेशान्वये त्यांच्या विरूध्द प्रकरण विनाम्हणने चालविण्यात येत आहे. गैरअर्जदार क्र.१ यांनी आपसातील नातेसंबंध मान्य केले. त्यांचे पुढे म्हणने असे की, विवाहा नंतर सन २०२० पावेतो अर्जदाराने गैरअर्जदाराशी गुण्यागोविंदाने संसार केला. परंतू त्यानंतर अर्जदाराचे स्वभावात अचानक बदल घडून आला व अर्जदाराने गैरअर्जदाराचे चारित्र्यावर संशय घेणे सुरू केले. इतकेच नव्हेतर अर्जदाराने गैरअर्जदाराचे परस्त्रीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याचे आरोप करून गैरअर्जदाराशी नेहमी झगडाभांडण करून त्याची बदनामी करणे सुरू केले त्यामुळे गैरअर्जदाराला प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. अर्जदाराचे सदर खोट्या आरोपांमुळे समाजातील लोक गैरअर्जदाराकडे हिन भावनेने पाहतात ज्यामुळे गैरअर्जदाराला समाजात वावरणे कठीण झालेले आहे.

११.	गैरअर्जदार क्र.२ म्हातारी असुन ती कधी गैरअर्जदाराचे घरी आल्यास अर्जदार ही घरी येण्यास मज्ञाव करीत होते त्यामुळे गैरअर्जदाराची आई मागील सात–आठ

वर्षा पासून कधीही गैरअर्जदाराचे घरी आली नाही व ती एकटीच रामनगर येथे राहते. गैरअर्जदार हे त्याचे आईचे घरी गेले असता अर्जदार गैरअर्जदाराला तुम्ही तुमचे आईच्या घरी कशाला गेले असे बोलुन त्यांचेशी झगडा भांडण करीत होती. अर्जदार सतत गैरअर्जदाराचे आई बहीणीच्या नावे शिवीगाळ करीत असल्याने गैरअर्जदाराचे घरी कोणतेही नातेवाईक येत नाहीत, गैरअर्जदार हे अर्जदारा सोबत वास्तव्यास असतांना घरी काम करणाऱ्या बायांसमक्ष देखील गैरअर्जदारास अश्लिल शब्दात शिवीगाळ करून तसेच त्यास एकेरी भाषेत बोलून अपमानीत करीत असते. अर्जदार घरी असतांना गैरअर्जदाराचे कपडे कधीही धुत नव्हती, गैरअर्जदारास वेळेवर स्वयंपाक करून देत नव्हती. तसेच दिनांक ३०/१२/२०२१ ला अर्जदार गैरअर्जदारास चाकु मारण्याचा प्रयत्न केला व स्वतःच पोलीस स्टेशनला रात्री ८.०० वाजता जावून खोटी तकार दिली असल्यामुळे गैरअर्जदाराचे जिवीतास धोका निर्माण झालेला आहे तसेच अर्जदार ही गैरअर्जदारास गंभीर खोट्या गुन्ह्यात फसविण्याची भिती गैरअर्जदाराचे मनात निर्माण झाली आहे.

१२.　　अर्जदार ही अखील भारतीय रिपब्लीकन पक्ष महिला आघाडीची शहर प्रमुख असून पक्षातील वरिष्ठ कार्यकर्त्यांच्या भडकविण्यावरून गैरअर्जदाराची बदनामी करीत असते, तसेच अर्जदार ही दोन्ही मुलांच्या मनात गैरअर्जदारा विषयी व्देषभावना निर्माण करून त्यांना गैरअर्जदारापासून दुर ठेवण्याचा प्रयत्न चालवित आहे. दिनांक ०२/०१/२०२२ रोजी अर्जदार गैरअर्जदाराशी कोणत्याही कारणाशिवाय झगडा भांडण करून त्यास घराबाहेर हाकलून दिल्यामुळे गैरअर्जदाराला त्याचे आईकडे मौजा – रामनगर, गडचिरोली येथे येवून राहणे भाग पडले आहे व अर्जदार ही दोन्ही मुलांसह गैरअर्जदाराचे स्वमालकीचे घरी विभक्त राहत आहे. असे असतांना सुध्दा गैरअर्जदारास शारीरिक, मानसिक व आर्थीक त्रास देण्याचे एकमेव उद्देशाने गैरअर्जदाराचे विरोधात महीला व बाल विकास अधिकारी कार्यालय गडचिरोली येथे खोटी तक्रार दाखल केली. त्यामुळे गैरअर्जदारास जनमानसात बदनामीला सामोरे जावे लागत आहे व त्यास जिवन जगणे कठीण झाले आहे.

१३.　　गैरअर्जदाराने कधीही अर्जदाराशी कोणताही कौटुंबिक हिंसाचार केलेला नसतांना अर्जदाराने गैरअर्जदारा विरूध्द कौ. हि. म. सं. का. अर्ज क. ०५/२०२२ दाखल केलेला होता. परंतू गैरअर्जदाराला अर्जदाराशी गुण्यागोविदांने संसार करायचा असल्याने

अर्जदार व गैरअर्जदारा मध्ये दिनांक २६.०४.२०२२ रोजी समझोता घडून आला. सदर समझोत्या प्रमाणे अर्जदार ही चांगली वागेल व आपला संसार सुखाचा होईल अशी गैरअर्जदाराला आशा होती. परंतू अर्जदाराने काही दिवसांनी पुन्हा गैरअर्जदाराशी कोणत्याही कारणाशिवाय झगडा भांडण करून त्याला मानसिक त्रास देणे सुरू केले. इतकेच नव्हेतर अर्जदार नेहमी गैरअर्जदाराचे चारित्र्यावर संशय घेवून झगडा भांडण करणे, गैरअर्जदाराला मारण्याकरीता अंगावर धावून जाणे व स्वतःच पोलीस स्टेशनला खोटी रिपोर्ट देणे हि नित्याचीच बाब झालेली आहे. गैरअर्जदाराला अर्जदाराकडून होत असलेल्या त्रासाची तक्रार गैरअर्जदाराने दिनांक १४/०१/२०२३ रोजी पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे दिली. परंतू पोलीसांनी अर्जदाराविरूध्द कोणतीही कारवाई केली नाही किंवा तिला समज सुध्दा दिली नाही. अर्जदाराला गैरअर्जदारा पासून कधीही कोणताही कौटुंबिक हिंसाचार वा त्रास नसतांना अर्जदाराने खोट्या कथनाचे आधारे सदर खोटा मामला दाखल केलेला असल्याने सदर मामला खारीज होण्यास पात्र आहे.

१४. अर्ज, गैरअर्जदारांचे म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रे व प्रतिज्ञालेख यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचे अधिवक्ता यांचा युक्तिवाद ऐकला.

१५. प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम खावटीचा असल्यामुळे, अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाला, याबाबत ठोस पुरावा या क्षणी आवश्यक नाही. तसेच सदरचा मुळ अर्ज निकाली काढण्याकरिता अवधी लागणार असल्यामुळे दरम्यानच्या कालावधीकरिता अर्जदार ही स्वतःकरिता गैरअर्जदारकडुन अंतरिम खावटी मिळण्यास पात्र आहे किंवा नाही, असल्यास त्यांची काय आवश्यकता आहे, तसेच गैरअर्जदार किती सक्षम आहे, एवढा मुद्दा या क्षणी महत्वाचा असून तो चर्चेस घेण्यात येत आहे.

१६. येथे नमूद करणे गरजेचे आहे की, अर्जदार ही सद्यस्थितीत गैरअर्जदारापासून विभक्त राहत असल्याचे दोन्ही पक्षांना मान्य आहे. कुठलीही स्त्री विवाहानंतर स्वेच्छेने विनाकारण पतीचे घर सोडून तिचे माहेरी राहणार नाही. अर्जदाराने शपथेवर तिच्या अर्जाच्या कथनांना पुष्टी दिली आहे. अर्जदाराने पोलीसांकडे दिलेल्या रिपोर्टची व अदखलपात्र गुन्हयाच्या अहवालाच्या प्रती अभिलेखावर दाखल केल्या आहेत. त्याचप्रमाणे यापुर्वी दाखल केलेल्या कौटूंबिक हिंसाचाराच्या प्रकरणातील कागदपत्रे व समझेता लेख दाखल केले आहेत. त्यामध्ये सुध्दा गैरअर्जदाराने लिहून दिले होते की, तो

अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रास देणार नाही. सदर कागदपत्रे ही अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील कथनांना पुष्टी आणि बळकटी देतात. अर्जदाराच्या अर्जाचे व प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता, अर्जदाराचा गैरअर्जदाराने कौटुंबिक हिंसाचार केला हे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, अर्जदार ही तिचा कौटुंबिक हिंसाचार झाल्यामुळे विभक्त राहत आहे. येथे नमूद करणे गरजेचे आहे की, कौटुंबिक हिंसाचार झाल्याच्या ठोस पुराव्याची या क्षणी गरज नाही.

१७. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये नमूद केले की, गैरअर्जदार जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधमाळा ता धानोरा जि गडचिरोली येथे शिक्षक या पदावर नौकरीवर असून त्याला प्रतिमहा रक्कम रू. १,५०,०००/– पगार मिळतो. तसेच त्याचेकडे मौजा मासरगाटा ता धानोरा, जि. गडचिरोली येथे २ एकर शेती असून त्यापासून प्रतिवर्ष रक्कम रू २,००,०००/– उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराने त्याच्या नौकरीबाबतचे तथ्य मान्य केले आहे परंतु अर्जदाराच्या कथनाप्रमाणे पगार मिळत असल्याचे नाकारले आहे. परंतु त्याचा नेमका पगार किती आहे याबाबत कोणताही खुलासा म्हणण्यात केला नाही. तसेच गैरअर्जदाराने मत्ता व दायीत्वे यांच्या प्रतिज्ञापत्रात सुध्दा त्याच्या नोकरीबाबत किंवा पगाराबाबत काहीही उल्लेख केलेला नाही. सदर बाब आश्चर्यकारक आहे. परंतु त्याने कार कर्ज व गृहकर्ज याबाबत कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच मुलांच्या शैक्षणीक व हॉस्टेलची फी भरल्याबाबतची कागदपत्रे गैरअर्जदाराने दाखल केली आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या शेतीबाबतचे काही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदाराला शेतीतुन काही उत्पन्न मिळते हे दर्शविण्याकरिता प्रथमदर्शनी पुरावा समोर नाही.

१८. एकूण प्राप्त परिस्थीती पाहता गैरअर्जदारावर अर्जदार व त्याची आई अवलबुंन असल्याचे स्पष्ट होते. तसेच अर्जदार हिचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे असा निष्कर्ष काढण्यात येतो. जरी गैरअर्जदाराने त्याच्या उत्पन्नाबाबत काही भाष्य केले नसले तरी गैरअर्जदाराला नोकरीमधुन पगार मिळतो हे स्पष्ट आहे. सबब, त्याच्याकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे स्पष्ट होते.

१९. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदाराची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ हे त्यांची मुले अपत्ये आहेत, ही बाब दोन्ही पक्षास मान्य असुन त्या नात्याने अर्जदार यांचे पालनपोषण करण्याची नैतिक जबाबदारी ही गैरअर्जदाराची आहे. ही जबाबदारी गैरअर्जदार

टाळू शकत नाही. येथे नमूद करणे महत्वाचे आहे की, अंतरिम खावटीचा उददेश केवळ प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपावेतो अर्जदारांना आर्थिक सहकार्य करण्याकरिता मदत व्हावी म्हणून असतो.

२०. अर्जदार हे सध्या साईनगर येथील घरात राहत असल्याबाबत गैरअर्जदाराचे दुमत नाही. प्रथमदर्शनी समोर आलेल्या परिस्थीतीचे अवलोकन करता सदर घरातुन अर्जदारांना गैरअर्जदार हे काढू शकतात किंवा रहिवासास अडथळा करू शकतात अशी शक्यता आहे. परंतु गैरअर्जदार सदर घर मालमत्ता किंवा अर्जदाराचा हिस्सा असलेली इतर कोणतीही मालमत्ता किंवा शेतजमिन विकण्याच्या प्रयत्नात असल्याबाबत अर्जदाराने प्रथमदर्शनी दाखवून दिलेले नाही. त्यामुळे घरातुन काढू नये, रहिवासास अडथळा करू नये व कौटूंबिक हिंसाचार करू नये असा प्रतिबंधात्मक व संरक्षण आदेश पारित करता येईल. परंतु मालमत्ता विकू नये किंवा हस्तांतरण करू नये किंवा बक्षिस करू नये असा प्रतिबंधात्मक आदेश मिळण्यास अर्जदार पात्र नाही.

२१. सबब, समोर आलेली संपुर्ण परिस्थिती व तथ्ये, सध्याच्या दैनंदिन गरजा, वाढती महागाई व इतर खर्च लक्षात घेता तसेच दोघांचेही राहणीमान लक्षात घेता, तसेच गैरअर्जदार यांचे उत्पन्न व समोर आलेली कागदपत्रे यांचा सारासार विचार करता गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ हिला दरमहा ₹ २०,०००/– (अक्षरी रूपये विस हजार मात्र) आर्थिक खर्च व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा ₹ १०,०००/– (अक्षरी रूपये दहा हजार मात्र) आर्थिक खर्च दिल्यास न्यायोचित होईल. सबब, अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ हिला दरमहा ₹ २०,०००/– (अक्षरी रूपये विस हजार मात्र) आर्थिक खर्च व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा ₹ १०,०००/– (अक्षरी रूपये दहा हजार मात्र) आर्थिक खर्च प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपावेतो दयावा.

३. गैरअर्जदार यांनी किंवा त्यांच्यातर्फे इतर कोणीही विधीच्या योग्य प्रक्रियेशिवाय प्रस्तुत मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपावेतो अर्जदार यांना मौजा साईनगर, वार्ड

क्र.४, गडचिरोली, ता.जि.गडचिरोली येथील घरातुन काढू नये किंवा त्यांच्या रहिवासास अडथळा करू नये किंवा त्यांचा कसलाही कौटूंबिक हिंसाचार करू नये.

४. अर्जदाराच्या इतर सर्व मागण्या नामंजुर करण्यात येतात.

५. सदर आदेशाची विनामुल्य प्रत दोन्ही पक्षांना देण्यात यावी.

स्वा/-

गडचिरोली .                    (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक – २९/११/२०२३          न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली.